imma™

Maharashtra Times

Karvy Group

Date: 09/09/2011 | Edition: Mumbai | Page: 11 | Source: Bureau | Clip size (cm): W: 15 H: 14

Clip: 1 of 1

# बांधकाम, ब्रोकिंग कंपन्या रिझर्व्ह बँकेवर नाराज

जीवन भावसार

- पुरेशी खबरदारी घेऊन या क्षेत्रालाही बँकिंग परवाने देण्याची मागणी
- रिझर्व्ह बँकेकडे निषेध नोंदवणार

रिझर्व्ह बँकेने बँकिंग क्षेत्रात कॉर्पोरेट्सना प्रवेश देण्यासाठी दिशानिर्देश जाहीर करताना बांधकाम उद्योग आणि ब्रोकिंग क्षेत्रावर अन्याय केल्याचे म्हणत या क्षेत्राने नाराजी व्यक्त केली आहे. यासंदर्भात बँकेकडे नाराजी व्यक्त करणार असून या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी या क्षेत्राने केली आहे.

गेल्या आठवड्यात बँकिंग क्षेत्रातील कॉर्पोरेट्सच्या प्रवेशासाठी दिशानिर्देश जाहीर करताना बांधकाम उद्योग किंवा ब्रोकिंगमधून १० टक्के किंवा अधिक उत्पन्न/संपत्ती असणाऱ्या कंपन्यांना बँक सुरू करण्याचा परवाना मिळणार नाही, असे रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केले होते. बँकेचा हा निर्णय निराशाजनक असून बांधकाम क्षेत्राला गेल्या अनेक वर्षांपासून अशा सापत्नभावाला सामोरे जावे लागते आहे. अनेक प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय कंपन्या आणि बहुतांश भारतीय बँका बांधकाम क्षेत्राला वित्तपुरवठा करत आहेत. बांधकाम क्षेत्रात पुरेशी पारदर्शकता किंवा पात्रता नसेल तर या कंपन्यांकडून त्यांना वित्तपुरवठा का केला जाईल, असा सवाल 'महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री'चे अशोक मोहनानी यांनी केला आहे.

'क्रेडाई'चे राष्ट्रीय अध्यक्ष ललितकुमार जैन यांनी 'बांधकाम उद्योगाविषयी रिझर्व्ह बँकेने व्यक्त केलेले मत वाईट असून आम्ही त्याला विरोध करणार आहोत. लवकरच आम्ही यासंदर्भात रिझर्व्ह बँकेसमोर आमचे मत मांडणार असून अधिवेशन संपल्यानंतर अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांचीही भेट घेण्याचा आमचा प्रयत्न आहे', असे म्हटले आहे. रिझर्व्ह बँकेने कुठल्याही व्यवसायाविषयी असा दुजाभाव ठेवू नये. शहरी विकास आणि आर्थिक वृद्धी दराच्या दृष्टीने बांधकाम उद्योग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. अशा प्रकारे अलग ठेवून बांधकाम उद्योगावर अन्याय केला जातो आहे. बांधकाम उद्योग आणि इतर उद्योगांसाठी रिझर्व्ह बँकेने एकच मापदंड लावू नये. हवे तर बांधकाम उद्योगाच्या बाबतीत अधिक खबरदारी घ्या, त्यांच्यावर अधिक अटी लादा, पण त्यांना थेट वगळू नका, असेही जैन म्हणाले.

रिझर्व्ह बँकेने सुचविलेल्या सूचनांचे पालन करणाऱ्या व सुरक्षेच्या दृष्टीने पुरेशी खबरदारी घेणाऱ्या ब्रोकिंग कंपन्यांना बँकिंग क्षेत्रात प्रवेश द्यावा, अशी विनंती कर्वी फायनान्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सक्सेना यांनी केली आहे.